**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार, दिनांक २७ ऑगस्ट २०२४**

**ठळक बातम्या**

1. **श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्त आज राज्यभरात दहीहंडीचा थरार.**
2. **वैद्यकीय व्यावसायिकांच्या सुरक्षेबाबत राष्ट्रीय कृती दलाची पहिली बैठक आज नवी दिल्लीत संपन्न; विविध भागधारकांनी सूचना देण्याचं आवाहन.**
3. **महाराष्ट्राला १५ व्या वित्त आयोगाच्या तरतुदींनुसार ४०१ कोटींचे थकीत अनुदान जारी झाल्याची मंत्री सुधीर मुनगंटीवार यांची माहिती.**
4. **चंद्रपूरच्या तत्कालीन शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण निलंबित; विधानपरिषद आमदार सुधाकर अडबाले यांच्या तारांकित प्रश्नानंतर कारवाई.**
5. **नांदेडचे खासदार वसंतराव चव्हाण अनंतात विलीन; सर्वपक्षीय नेत्यांनी वाहिली श्रद्धांजली.**

****

दहीहंडीचा उत्सव

श्रीकृष्णाचा जन्मसोहळा म्हणजेच गोकुळाष्टमी काल सर्वत्र मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावानं साजरी झाली. राज्यात आज दहिकाल्याचा सण उत्साहात साजरा होत असून विशेषतः मुंबई, ठाण्यात ठिकठिकाणी गोविंदाचा थरार रंगत आहे. नागपुरात देखील अनेक ठिकाणी दही हंडी उत्सव आयोजित करण्यात आला आहे. बडकस चौक मित्र परिवाराच्या वतीने काल जन्माष्टमीला दहीहंडीचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यात नागपूरसह भंडारा, गोंदिया येथूनही गोविंदा पथके सहभागी झाली होती. शहरात सर्वात उंच अशा 6 ते 7 थर रचून दहीहांडी फोडण्याची परंपरा इतवारीतील नवयुवक मंडळाने कायम राखली आहे. हा थरार आज अनुभवायला मिळणार आहे. जयप्रकाश नगर स्थित गुरुमंदिर इथं काल बालगोपाळांसाठी दही हांडी, नृत्य नाटिका आणि गायन वादानाचा कार्यक्रम आयोजिण्यात करण्यात आला होता. त्याचप्रमाणे अनेक शाळांमधून देखील गोकुळाष्टमी साजरी करण्यात आली.

वैद्यकीय व्यावसाइक-NTF

वैद्यकीय व्यावसायिकांची सुरक्षा तसंच कामाच्या ठिकाणची परिस्थिती याबाबत सर्वोच्च न्यायालयानं स्थापन केलेल्या राष्ट्रीय कृती दलाची पहिली बैठक आज नवी दिल्ली इथं झाली. या बैठकीच्या अध्यक्षपदी केंद्र सरकारचे कॅबिनेट सचिव होते. यावेळी केंद्रीय गृह सचिव, राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाचे अध्यक्ष, सर्जन, व्हॉईस ॲडमिरल, एम्सचे संचालक आणि न्यूरोलॉजी विभागाचे माजी प्राध्यापक उपस्थित होते. बैठकीत विवध विषयांवर चर्चा झाली, समितीच्या सदस्यांनी आपल्या सूचना मांडल्या. केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं suggestions to NTF या संकेतस्थळावर नागरिकांकडून सूचना मागवल्या

आहेत. तसंच राज्यांमधल्या वैद्यकीय संस्थामध्ये उपलब्ध असलेल्या सुरक्षा उपयांची माहिती देण्याची विनंती आरोग्य मंत्रालयानं राज्य सरकारांना केली आहे.

वित्त आयोग अनुदान

महाराष्ट्र राज्याला १५व्या वित्त आयोगाच्या अनुषंगानं मिळणाऱ्या निधीचा मार्ग सुकर झाला आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना महाराष्ट्राला ४०१ कोटींचे थकीत अनुदान देत असल्याची माहिती वन, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांना दिली. महाराष्ट्र राज्याला पंधराव्या वित्तीय आयोगाच्या अनुषंगानं सन २०२३-२४चे केंद्र शासनाकडून नगरपालिका प्रशासन आणि नगरपरिषदांकरिता मिळणारे अनुदान थकित होते. या निधी अभावी नगरपंचायती, नगरपालिका आणि महानगरपालिका अशा एकूण 421 ठिकाणी विविध विकास कार्य रखडलेली होती. त्यामुळे हा निधी मिळवून नगरपालिका प्रशासन आणि नगरपरिषदांकरिता मिळणाऱ्या अनुदानाचा विषय मार्गी लागावा असा मुनगंटीवार यांचा आग्रह होता.

राज्यसभा नियुक्ती

राज्यातल्या राज्यसभेतच्या दोन जागांवर धैर्यशील पाटील आणि नितिन पाटील यांची बिनविरोध निवड झाली आहे. महाराष्ट्र विधीमंडळानं प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे.

छत्रपती पुतळा

सिंधुदुर्ग मालवण इथल्या राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळा कोसळल्याच्या घटनेवर सर्व स्तरांतून तीव्र प्रतिक्रीया उमटत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा अवघ्या ८ महिन्यात कोसळणे ही खेदजनक घटना असून हा आमच्या दैवताचा अपमान असल्याची प्रतिक्रिया महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे. टिळक भवन इथं पत्रकारांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, महाराष्ट्रातील भाजप युती सरकार हे भ्रष्टाचारी आहे. शिवाजी महाराजांची भव्य मूर्ती उभारण्याचं काम ठाण्यातील नवख्या शिल्पकाराला देण्यात आलं, भौगोलिक बाबींचा अभ्यास न करता लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर मतं मिळवण्यासाठी घाईगडबडीत या पुतळ्याचं उद्घाटन करण्यात आलं. सरकारनं कामाच्या दर्जाकडे लक्ष न देऊन महाराजांचा अवमान केला आहे, असा आरोप पटोले यांनी केला. दरम्यान, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी आज सकाळी मालवण-राजकोट इथं छत्रपती शिवाजी महाराज पुतळा कोसळला त्या ठिकाणाला भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. हा एक अपघात आहे आणि त्या दृष्टीनेच सर्वांनी त्याकडे पहावं. या अपघाताची चौकशी शासन नक्की करेल असं केसरकर यावेळी म्हणाले. मालवण राजकोट इथं स्टॅच्यू ऑफ लिबर्टीच्या धर्तीवर १०० फुटी पुतळा

उभारावा आणि इथल्या भागाचा विकास करावा अशी मागणी आपण मुख्यमंत्र्यांकडे करणार असल्याचं देखील केसरकर यांनी सांगितलं.

रोहित पवार

मागील पाच वर्षापासून अमरावती जिल्ह्याचा विकास झालेला नाही. त्यामुळे यंदा झालेल्या लोकसभा निवडणुकीत तत्कालीन खासदारांना जनतेने त्यांची जागा दाखवून दिली.आता आगामी विधानसभा निवडणुकीत त्या आमदारांनाही पदाला मुकावे लागेल. त्यामुळे आधी खासदारकी गेली आता आमदारकीही जाईल, असा इशारा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे युवा नेते आमदार रोहित पवार - यांनी राणा दांपत्याला दिला. काल जाधव पॅलेस इथं राष्ट्रवादीचा कार्यकर्ता मेळावा घेण्यात आला. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत पवार यांनी महायुतीवर तोफ डागली. देशात महिला अत्याचार, बेरोजगारी, महागाई, शेतकरी आत्महत्या, खासगीकरण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. त्यामुळे मराठी माणूस त्यांना धडा शिकवेल. या वेळी महाविकास आघाडीला २३०पेक्षा अधिक जागा मिळतील, असा विश्वास देखील रोहित पवार यांनी यावेळी व्यक्त केला.

रामदास आठवले

रिपब्लिकन पक्षाला पुढं जायचं असेल तर स्वबळावर आमदार निवडून आणल्याशिवाय पक्ष बळकट होऊ शकत नाही.त्यामुळे पक्ष बळकट करण्यासाठी शिस्त पाळा; सर्व जाती धर्मियांना सोबत घ्या. लोकांचा विश्वास जिंकून विधानसभेत आपले लोक निवडून आणा, असं आवाहन, रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केलं. पुणे इथल्या बालगंधर्व रंगमंदिर सभागृहात तिसऱ्यांदा केंद्रीय राज्यमंत्री झाल्याबद्दल आठवले यांचा रिपब्लिकन पक्षाच्या पुणे शहर तर्फे सत्कार करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

शिक्षणाधिकारी निलंबन

चंद्रपूरच्या तत्कालीन शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण यांनी त्यांच्या कार्यकाळात केलेल्या अनियमिततेसाठी एसआयटीमार्फत चौकशी करावी आणि त्यांना निलंबित करावं अशी मागणी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले यांनी यंदाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून केली होती. आठवडाभरात त्यांचा खुलासा प्राप्त होताच निलंबित करू, असं उत्तर सभागृहात शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी दिलं होतं. त्यानुसार शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाचे सहसचिव यांनी कल्पना चव्हाण यांना शासन सेवेतून निलंबित केलं आहे.चंद्रपूरच्या माध्यमिक शिक्षण विभागात चव्हाण तीन वर्षांपूर्वी रुजू झाल्या होत्या. त्यांच्या कार्यकाळात जिल्ह्यातील अनेक शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची प्रकरणे प्रलंबित ठेवली जात होती. चव्हाण यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 च्या नियम 10 अन्वये दोषी ठरविण्यात

आलं होतं. मात्र, पुढे त्यांच्यावर कारवाई होत नव्हती. सदर प्रकरणाबाबत आमदार अडबाले सतत पाठपुरावा करीत होते. विदर्भातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रकरणात हलगर्जीपणा आणि अनियमितता करणाऱ्या शिक्षणाधिकारी आणि अन्य अधिकारी यांची यापुढेही गय केली जाणार नसल्याचं नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार सुधाकर अडबाले यांनी सांगितलं आहे.

स्व.खा.वसंतराव चव्हाण

नांदेडचे खासदार वसंतराव चव्हाण यांच्या पार्थिवावर आज दुपारी नायगाव इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पालकमंत्री गिरीश महाजन, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, खा.रजनीताई पाटील, यांसह सर्वच पक्षातील लोकप्रतिनिधी उपस्थित होते. राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी राज्य शासनामार्फत पुष्पचक्र अर्पण करीत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. पोलीस दलातर्फे त्यांना हवेत तीन फैरी झाडून अंतिम सलामी देण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी दिवंगत खासदार वसंतराव चव्हाण यांच्या कार्याला उजाळा दिला. आपल्या लाडक्या नेत्याला शेवटचा निरोप देण्यासाठी जनसागर लोटल्याचं चित्र यावेळी पाहायला मिळालं.

बदलापूर

महाराष्ट्रात बदलापूर इथल्या लैंगिक अत्याचार प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षण विभागाने नेमलेल्या शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग आणि राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्ष यांच्या समितीचा प्राथमिक अहवाल शासनास सादर झाला आहे. या अहवालातील निरीक्षणं तपास यंत्रणांना सादर करण्यात येणार असून शिक्षण विभागाअंतर्गत स्वतंत्र हेल्पलाईन सुरू करण्यात येणार असल्याचं शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी सांगितलं. दोषी ठरलेल्यांना पाठिशी घातले जाणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. महिलांवर अत्याचार रोखण्यासाठी मोबाईलवर पॅनिक बटन देता येईल, यासाठी महिला आणि बालविकास तसंच गृहविभागामार्फत निर्णय घेण्यात येणार आहे.

रमाई घरकुल योजना

सामाजिक न्याय विभागातर्फे अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी रमाई आवास घरकुल योजनेतंर्गत चंद्रपूर जिल्ह्यात चालू आर्थिक वर्षासाठी प्राप्त यादीनूसार 503 घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे सर्व लाभार्थ्यांना आता हक्काचे घरकुल मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## तक्रार निवारण

नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी केंद्र सरकारनं नव्या सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. केंद्र सरकारच्या www.pgportal.gov.in (डब्ल्यू डब्ल्यू डब्ल्यू डॉट पी जी पोर्टल डॉट जीओव्ही डॉट इन) या पोर्टलवर नागरिक तक्रार दाखल करु शकतात. ही एकल खिडकी व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व मंत्रालय विभागांच्या तक्रारींची दखल घेण्यासाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाणार असून, हे अधिकारी या तक्रारींचं वर्गीकरण करतील आणि प्रलंबित खटल्यांच्या निपटाऱ्यावर देखरेख ठेवतील. प्रत्येक मंत्रालयासाठी एक समर्पित तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला असून, २१ दिवसात प्रत्येक तक्रारींचं निवारण करणं आणि सर्व विभागांनी तक्रार निवारणाचा वेळोवेळी आढावा घेणं अनिवार्य आहे.

## हवामान

अकोला, वाशिम, बुलढाणा, आणि यवतमाळ वगळता संपूर्ण विदर्भात विजांच्या कडकडाटासह वादळाचा येलो अलर्ट उद्या साठी जारी करण्यात आला आहे. ३१ तारखेपर्यंत साठी हा इशारा देण्यात आला असून याशिवाय पूर्व विदर्भात काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

*****